सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# GOVERNMENT POLYTECHNIC, CHHATRAPATI SAMBAHJINAGAR

( An autonomous Institute of Govt. of Maharashtra )
Station Road, Osmanpura, Chhatrapati Sambhajinagar (M.H.)
Phone : 2334724 /2321917/2353644 Resi : 2331562
Website www.gpabad.ac.in , e-mail-principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in

Date: 25 APR 2024

No. : GPA /Store/ 2024-25/ 1428

**विषय :— या संस्थेतील जुनी रद्दी विकत घेणेबाबत निविदा मागविणेबाबत.**

वरील विषयी आपणास सुचित करण्यात येते की, खालील अटीच्या अधिन राहुन मान्यता प्राप्त कंत्राटदारांनी आपले जास्तीत जास्त दराचे निविदा (Competitive Quotations) खालील प्रकारची रद्दी विकत घेणेकरिता पाठविण्यात यावे.

अटी व शर्ती :—

१. संस्थेतील रद्दी संस्थेमध्ये विभागाच्या भांडार समितीसमोर स्वखर्चाने मोजावी लागेल. रद्दीचे वजन स्प्रिंग काटयावर करण्यात येवु नये. सदरील वजन हे इलेक्ट्रॉनिक्स काटयावरच करावे लागेल.
२. सदर रद्दी गोपनीय स्वरूपाची असल्याने तात्काळ चार तुकडे करण्यात यावेत व नंतरच रद्दी गोणीमध्ये भरून घेण्याची जबाबदारी आपली राहील व त्याकरिता लागणारे कोणतेही सामान, मोबदला देय राहणार नाही.
३. **सदर रद्दी पल्पिंगसाठी मिलकडे तात्काळ पाठवावी व त्याचे रितसर प्रमाणपत्र या कार्यालयास १० दिवसाचे आत सादर करणे ही जबाबदारी रद्दी खरेदी दाराची राहील**
४. रद्दी खेरदीचा पुरवठा आदेश मिळताच रूपये १०,०००/— (अक्षरी दहा हजार) अनामत रक्कम या संस्थेत ठेवणे बंधनकारक राहील.
५. सदर रद्दीची संपुर्ण किंमत या संस्थेत तात्काळ भरून रितसर पावती घ्यावी लागेल त्याशिवाय आपणास सदर रद्दी संस्थेच्या बाहेर नेण्याची परवानगी राहणार नाही.
६. सदर संपुर्ण रद्दीचे पल्पिंग केलेले प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केल्यानंतरच आपली अनामत रक्कम आपणास परत करण्यात येईल.
७. सदर संपुर्ण रद्दी गोपनिय स्वरूपाची असल्यामुळे हया बाबत पुर्णत: गोपनीयता राखण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
८. कंत्राटदारास १००/— रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर रद्दी खरेदीच्या अटी मान्य असल्याचा करारनामा सादर करावा लागेल
९. कंत्राटदारांनी आपल्या निविदा सिलबंद लिफाफयामध्ये पाठवाव्यात व त्या लिफाफयावर **जुनी रद्दी बाबत निविदा** असे ठळक अक्षरात नमुद करून **दिनांक ०४/०५/२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** या कार्यालयात पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात त्यानंतर प्राप्त झालेल्या निविदा हया ग्राहय धरण्यात येणार नाहीत.
१० शासकीय कार्यालयातील मागील दोन वर्षात खरेदी केल्याचा अनुभव / पुरवठा आदेश तसेच शासकीय कार्यालयात सादर केलेले पल्पिंग प्रमाणपत्र निविदेसोबत जोडण्यात यावे.
११. सदर निविदा हया किमान सहा महिने वैध असाव्यात.
१२. सदर निविदाचे संपुर्ण अधिकार हे खालील स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याकडे राहतील.

| अ.क्रं. | रद्दीचा प्रकार | दर रूपये प्रति किलो | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | जुन्या उत्तर पत्रिका (Answersheet) | | रद्दीचा दर हा प्रति किलो प्रमाणे नमुद करण्यात यावा. |
| ०२ | ईतर रद्दी | | |

* संस्थेतील रद्दी ही अंदाजे ५०० किलो किंवा जास्त भरू शकते.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन
छत्रपती संभाजीनगर